हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग : मुख्यमंत्री फडणवीस >> पान 2

पेट्रोल पंप बंदच्या अफवेने अमरावतीत खळबळ; एसआरपीएफपंपावर नागरिकांची तुफान गर्दी >> पान 3

जनगणना २०२७ साठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिरास उत्साहात सुरुवात >> पान 4

**सुविचार**

वास्तववादी व्हा: चमत्कारासाठी योजना आखा.– ओशो


दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 227 ■ शुक्रवार, दि. 27 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे केली बोमन इराणी यांनी मागणी, मजेदार व्हिडिओ व्हायरल

आतील पान

# पश्चिम आशियातील संघर्षप्रश्नी पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्र्यांसोबत घेणार बैठक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियामध्ये वाढत चाललेल्या संघर्षाच्या पार्श्र्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची एक आभासी बैठक बोलावली आहे, असे वृत्त 'पीटीआय'ने दिले आहे. पंतप्रधान मोदी शुक्रवारी मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून सुरू असलेल्या युद्धावर चर्चा करतील.

या बैठकीचा मुख्य उद्देश संकटकाळात समन्वय राखणे आणि 'टीम इंडिया' या भावनेतून एकसंध दृष्टिकोन विकसित करणे हा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलवल्या बैठकीत आगामी काळात निवडणुका होणार्या राज्यांमधील मुख्यमंत्री सहभागी होण्याची शक्यता कमी आहे.

**निवडणुका होणाऱ्या राज्यांमधील मुख्यमंत्री सहभागी होण्याची शक्यता कमी**

युद्धाचे जागतिक आणि देशांतर्गत पडसाद दीर्घकाळ उमटू शकतात, असा इशारा देतानाच पंतप्रधान मोदी यांनी पूर्वतयारी आणि लवचिकतेवर भर दिला आहे. संसदेला संबोधित करताना मोदींनी या युद्धाचे वर्णन 'जागतिक ऊर्जा संकटाचे कारण' असे केले. ज परिस्थिती अशीच राहिली, तर त्याचे परिणाम अटळ असून ते प्रदीर्घ काळ टिकू



शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. देशावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी सरकार सक्रियपणे काम करत असल्याचे आश्र्वासन देतानाच, त्यांनी नागरिकांना संभाव्य अडथळ्यांसाठी तयार राहण्याचे आवाहन केले.

कोरोना काळानुसारच केंद्र सरकारने इंधन, पुरवठा साखळी, खते आणि महागाई यांसारख्या गंभीर क्षेत्रांचे व्यवस्थापन करण्यासाठी सात अधिकारप्राप्त गट स्थापन केले आहेत. त्याचबरोबर भारत आपल्या ऊर्जा स्रोतांचे वैविध्य वाढवत असून, कच्च्या तेलासाठी आणि गॅससाठी नवीन बाजारपेठा शोधत आहे, जेणेकरून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा विनाव्यत्यय सुरू राहील. देशांतर्गत पातळीवर, मोदींनी पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी आणि संकटाच्या झळांपासून गरीब जनतेचे संरक्षण करण्यासाठी राज्यांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. विशेषतः शेतकऱ्यांचे संरक्षण करणे आणि गरीब व स्थलांतरित मजुरांना जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी संसदेत बोलताना सांगितले.

# युद्धबंदीच्या चर्चेसाठी इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांचे नाव 'हिट लिस्ट'मधून वगळले!

## पाकिस्तानच्या विनंतीनंतर राजकारणात नवा ट्विस्ट





**जेरूसलेम/वृत्तसंस्था :** इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्र्वभूमीवर एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. इस्रायलने इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आणि संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर गालिबाफ यांना आपल्या 'हिट लिस्ट'मधून तात्पुरते वगळले आहे. या निर्णयामागे पाकिस्तानची मध्यस्थी असल्याचे सांगितले जात आहे.

पाकिस्तानने अमेरिकेला विनंती केली होती की, इराणच्या या दोन वरिष्ठ नेत्यांना लक्ष्य करू नये. कारण, हे दोघेही संभाव्य चर्चेसाठी महत्त्वाचे दुवे मानले जात आहेत. इस्लामाबादमधील एका सूत्राने सांगितले की, 'जर हे नेतेही संपवले गेले, तर संवादासाठी कोणी उरणार नाही.' त्यानंतर अमेरिकेने इस्रायलला मागे हटण्याचा सल्ला दिला.

**अमेरिका-इराण चर्चेची शक्यता**

अब्बास अराघची हे अमेरिकेसोबतच्या अणू चर्चांमध्ये इराणचे प्रतिनिधित्व करत होते आणि ते अनुभवी मुत्सद्दी मानले जातात. तर गालिबाफ यांना व्हाईट हाऊसकडून 'व्यवहार्य भागीदार' म्हणून पाहिले जाते. रॉयटरच्या बातमीनुसार, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा चर्चेचे दरवाजे उघडण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यासाठी या दोघांना काही दिवसांसाठी लक्ष्यसूचीतून वगळण्यात आले.

**इराणच्या नेतृत्वावर सतत हल्ले**

सध्याच्या युद्धात इस्रायलने इराणच्या अनेक वरिष्ठ नेत्यांना लक्ष्य केले आहे. सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनी आणि सुरक्षा प्रमुख अली लारिजानी यांच्यासह अनेकांचा मृत्यू झाला आहे.

**दृष्टिक्षेपात...**

✻ पाकिस्तानच्या हस्तक्षेपामुळे इराणच्या दोन वरिष्ठ नेत्यांना तात्पुरता दिलासा

✻ अमेरिका-इराण चर्चेसाठी संवादाचे मार्ग खुले ठेवण्याचा प्रयत्न

✻ इस्रायलचे इराणी नेतृत्वावर सातत्याने लक्ष्य

✻ ट्रम्प यांच्या वक्तव्यामुळे तणाव आणखी वाढण्याची शक्यता

# ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं दुःखद निधन; वयाच्या ८५ वर्षी घेतला अखेरचा श्वास

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** एक अतिशय दुःखद बातमी समोर आली आहे. महाराष्ट्राचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं दुःखद निधन झालंय. पहाटेच्या सुमारास त्यांचं निधन झाल्याची माहिती आहे. ते ८५ वर्षाचे होते. ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ, विचारवंत आणि राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे खंदे पुरस्कर्ते डॉ. जयसिंगराव पवार यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ होती. परिणामी त्यांच्यावर रुग्णालयात उपचार देखील सुरु होते. अखेर त्यांची आज पहाटे प्राणज्योत मालवली. त्यांच्या या अकाली निधनाच्या बातमीने ''मराठेशाहीचा इतिहासकार हरपला'' अशी भावना व्यक्त केली जात आहे. डॉ. जयसिंगराव पवार यांचा जन्म ३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील तडसर येथे झाला. डॉ. जयसिंगराव पवार यांनी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम.ए. (सर्वप्रथम) आणि पीएच.डी. पदवी संपादन केली. तीन दशकांहून अधिक काळ महाविद्यालयीन क्षेत्रात विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. महाविद्यालयातील एम.ए.पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी २० क्रमिक पुस्तके लिहिली. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू व इतिहास संशोधक डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. जयसिंगराव यांच्या संशोधन कारकिर्दीला १९६४ मध्ये सुरुवात केली. या काळात त्यांनी विद्यापीठातील इतिहास विभागात त्यांनी ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनाचा अनुभव घेतला.

# पत्नी-पत्नीच्या भांडणात मध्यस्थी पडली महागात

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** पती-पत्नीच्या भांडणात मध्यस्थी करायला जाणं एकाला चांगलंच महागात पडलंय. छत्रपती संभाजीनगरमध्ये एकाला कमरेच्या बेल्टने मारहाण करण्यात आली. यामध्ये २९ वर्षीय तरुण जखमी झाला असून प्रमोद भास्कर तांगडे याने थेट पोलिसांत धाव घेतली. रात्री ८.३० च्या सुमारास घडलेल्या या घटनेनं परिसरात खळबळ उडाली. छत्रपती संभाजीनगरमधील सनी सेंटर परिसरात रात्रीच्या सुमारास दोघांत राडा झाला. 'तू आमच्या पती-पत्नीच्या भांडणात मध्यस्थी का करतो?' असा जाब विचारात एकाला मारहाण करण्यात आली. श्रीमंत मगरे असे मारहाण करणाऱ्याचे नाव असून तो जटवाडा रोडवर अंबरहिल परिसरात राहतो. त्याच्या विरोधात प्रमोद तांगडे याने सिडको पोलिसांत फिर्याद दिली आहे. प्रमोद तांगडे सेंट्रिंग काम करतात. ते जालना जिल्ह्यातील चानकपुरी येथे आई व आजीला सोडण्यासाठी गावी गेले होते. त्यानंतर २३ मार्च रोजी ते रात्री साडेआठच्या सुमारास भाचा सतीशला उस्मानपुरा भागात सोडून घरी जात होते. त्यावेळी आंबेडकर चौकातून सनी सेंटरकडे जाताना एक अपघात झाला होता. तेव्हा ते अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी थांबले होते. दरम्यान, याचवेळी श्रीमंत मगरे तिथं आला आणि त्याने 'तू आमच्या पती-पत्नीच्या वादात मध्यस्थी का करतो?' असा सवाल करत मारहाण सुरू केली. कमरेच्या बेल्टने मारहाण केल्याने प्रमोद जखमी झाला आहे.





# ऑन-ड्युटी पोलिसाचा मृत्यू; QRT जवानाच्या घटनेने खळबळ

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** शहर पोलीस आयुक्तालयातील QRT (अति जलद पथक) मधील पोलीस कर्मचारी विजय दिलीप नागापुरे (वय ३५) यांच्या मृत्यूची धक्कादायक घटना बुधवारी (दि. २५ मार्च) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.

नागापुरे हे मूळचे मोर्शी तालुक्यातील धामणगाव काटपूर येथील रहिवासी असून सध्या अमरावती शहरात वास्तव्यास होते. ते मंगळवारी रात्री नाईट ड्युटीवर होते. ड्युटी संपल्यानंतर बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास पोलीस आयुक्तालयातील QRT कार्यालयात ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.







घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक पथक व डॉग स्कॉडच्या मदतीने तपास करण्यात आला. घटनास्थळावरून संबंधित पिस्तूलमधील बुलेट जप्त करण्यात आली आहे. ही घटना सर्वप्रथम QRT मधील पोलीस कर्मचारी आकाश दिलीप अंबरते यांच्या लक्षात आली. त्यांनी तत्काळ वरिष्ठांना माहिती दिली. त्यानंतर मृतदेह पुढील तपासासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. दरम्यान, या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस याबाबत सखोल तपास करत आहेत. या घटनेमुळे पोलीस दलात शोककळा पसरली आहे.

# राज्यात ३०–३१ मार्च दरम्यान मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यातील काही भागात अंशतः ढगाळ हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची शक्यता आहे.

दि. ३० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो.

**शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे**

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सोशल मीडियावर सध्या पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांमुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पेट्रोलियम नियम २००२ मधील तरतुदींचा वापर करून कडक निर्बंध लागू केले आहेत. जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही, असे स्पष्ट करत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

**जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश व निर्बंध**

**खुले इंधन विक्रीवर बंदी**

कोणत्याही पेट्रोल पंपावर पेट्रोल किंवा डिझेल प्लास्टिक बाटल्या, कॅन, डबे किंवा अनधिकृत कंटेनरमध्ये भरून देण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. इंधन केवळ वाहनांच्या टाकीतच भरून दिले जावे.

**अत्यावश्यक सेवांना प्राधान्य**

रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना इंधन पुरवठा करताना प्राधान्य देण्याच्या सूचना पंप चालकांना देण्यात आल्या आहेत.

**साठ्याची पारदर्शकता**

प्रत्येक पेट्रोल पंपाने दररोजचा उपलब्ध साठा आणि मागणीची माहिती फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

**सीसीटीव्ही देखरेख**

सर्व पेट्रोल पंप परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवावी आणि विक्रीच्या नोंदी नियमित अद्ययावत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

**दंडात्मक कारवाईचा इशारा**

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांविरुद्ध पेट्रोलियम नियम २००२, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

वाहनांमध्ये अनावश्यक साठा करून कृत्रिम टंचाई निर्माण करू नये. प्रशासनाला सहकार्य करावे आणि अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



## समाजमाध्यमांवर अफवांचा धुमाकूळ

देशात इंधन तुटवड्याच्या अफवांनी निर्माण केलेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पुरवठा सुरळीत असल्याची स्पष्ट ग्वाही दिली आहे. रशियाकडून ६० दशलक्ष बॅरल तेलखरेदीसारख्या निर्णयांमुळे भारताची ऊर्जा सुरक्षितता अधिक मजबूत झाली असून, विरोधकांचा अपप्रचार उघडा पडतो. देशात इंधनाचा तुटवडा निर्माण होणार, पेट्रोल-डिझेल मिळणार नाही, 'एलपीजी' सिलिंडरचा पुरवठा खंडित होणार,' अशा स्वरूपाच्या अफवांनी गेल्या काही दिवसांत समाजमाध्यमांवर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. मात्र, या सर्व गदारोळाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने स्पष्ट शब्दांत ग्वाही दिली आहे की, देशात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही आणि पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे. देशातील सार्वजनिक तेल विपणन कंपन्यांनीही बुधवारी देशात इंधनाचा पुरेसा साठा असल्याने सामान्यांनी घाबरू नये, असे आवाहन केले. तरीही विरोधकांकडून अपप्रचाराचा धडाका सुरूच आहे. या साऱ्या परिस्थितीकडे केवळ राजकीय चष्म्यातून न पाहता, वस्तुस्थितीच्या आधारे विश्लेषण करणे गरजेचे ठरते. प्रथम, केंद्र सरकारच्या भूमिकेकडे पाहणे आवश्यक आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने संसदेत आणि विविध माध्यमांतून वारंवार स्पष्ट केले आहे की देशात पेट्रोल, डिझेल, तसेच 'एलपीजी'चा पुरवठा सुरळीत सुरू आहे. देशातील तेलकंपन्यांकडे पुरेसा साठा आहे आणि आयातही नियमितपणे सुरू आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत तणाव असला, तरी भारताने वेळेवर पर्यायी उपाययोजना केल्या आहेत. रशियाकडून सुमारे ६० दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाची खरेदी करून भारताने आपली ऊर्जा सुरक्षितता अधिक मजबूत केली आहे. एवढेच नव्हे, तर नुकतीच दोन तेलवाहू जहाजे होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून भारताकडे मार्गस्थ झाल्याची माहितीही देण्यात आली आहे. याउलट पाकिस्तानचे एक जहाज इराणने रोखल्याची घटना घडली, यावरून भारताच्या मुत्सद्देगिरीचे आणि व्यवस्थापनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. या पार्श्वभूमीवर भारताची स्थिती इतर देशांच्या तुलनेत अधिक स्थिर असल्याचे दिसते. जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता असतानाही भारतात मात्र पुरवठा सुरळीत राहणे, ही केवळ योगायोगाची बाब नाही. त्यामागे गेल्या काही वर्षांत राबविण्यात आलेल्या दीर्घकालीन धोरणांचा मोठा वाटा आहे. विविध देशांमधून तेलखरेदीचे स्रोत विविधीकरण करणे, धोरणात्मक साठे निर्माण करणे, रिफायनरी क्षमता वाढविणे आणि ऊर्जा कूटनीतीचा प्रभावी वापर करणे, या सर्व बाबींमुळे भारत आज अधिक सक्षम स्थितीत आहे. याच्या उलट, काँग्रेसच्या कारकिर्दीत ऊर्जासुरक्षेची स्थिती काय होती, याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्या काळात भारत मोठ्या प्रमाणावर काही मोजक्या देशांवर अवलंबून होता. धोरणात्मक साठ्यांची संकल्पना मर्यादित होती आणि ऊर्जा कूटनीतीतही ठोस दिशादर्शन दिसत नव्हते. आज मात्र परिस्थिती बदललेली आहे. तरीही काँग्रेसकडून समाजमाध्यमांच्या माध्यमातून इंधन तुटवड्याच्या अफवा पसरवून जोरदार अपप्रचार सुरुच आहे. या अफवांमुळे सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि घबराट पसरते. परिणामी, लोक गरज नसतानाही मोठ्या प्रमाणावर इंधन साठवण्याचा प्रयत्न करतात. यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता वाढते. म्हणजेच, जे वास्तवात नाही, ते अफवांमुळे वास्तवात येण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच पंतप्रधानांनीही आपल्या संसदेतील भाषणात अपप्रचार करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेत, साठेबाजार करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला. याहून गंभीर बाब म्हणजे, काही राज्यांमध्ये, विशेषतः काँग्रेसशासित राज्यांमध्ये, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती तुलनेने अधिक असल्याचे दिसून येते. केंद्र सरकारने करांमध्ये काही प्रमाणात कपात केली असताना, राज्य सरकारांकडून आकारण्यात येणाऱ्या करांमुळे किमती वाढतात. अशा परिस्थितीत केंद्रावर टीका करण्यापेक्षा राज्य सरकारांनी स्वतःच्या धोरणांचा आढावा घेणे अधिक आवश्यक आहे. परंतु त्याऐवजी राजकीय आरोप-प्रत्यारोपांवर भर दिला जातो. ऊर्जासुरक्षेच्या दृष्टीने भारत सरकारने गेल्या काही वर्षांत अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. देशातील धोरणात्मक तेलसाठ्यांची क्षमता वाढविण्यात आली आहे. तसेच नवीकरणीय ऊर्जेवरही मोठ्या प्रमाणावर भर देण्यात आला आहे. सौर आणि पवनऊर्जेच्या माध्यमातून पारंपरिक इंधनांवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या सर्व उपाययोजनांचा एकत्रित परिणाम म्हणून भारताची ऊर्जासुरक्षा अधिक मजबूत झाली आहे. याचबरोबर, भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावरही सक्रिय भूमिका घेतली आहे. विविध देशांशी द्विपक्षीय करार करून ऊर्जापुरवठा सुनिश्चित केला आहे. संकटाच्या काळात जलद निर्णय घेण्याची क्षमता विकसित केली आहे. रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेलखरेदी करण्याचा निर्णय हे त्याचे उत्तम उदाहरण. काही पाश्चात्य देशांच्या दबावाला न जुमानता, भारताने आपल्या हिताला प्राधान्य दिले. यामुळे देशांतर्गत इंधनपुरवठा स्थिर राहिला. आज भारत एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे. जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवरही देशाने आपली अर्थव्यवस्था आणि ऊर्जासुरक्षा स्थिर ठेवली आहे. हे यश सहजासहजी मिळालेले नाही. त्यामागे दीर्घकालीन नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि सक्षम नेतृत्व यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे केवळ राजकीय फायद्यासाठी अशा अफवा पसरवणे हे देशहिताच्या विरोधात आहे. विरोधकांची भूमिका लोकशाहीत महत्त्वाची असते. सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे, चुका दाखवून देणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. परंतु, त्याचवेळी जबाबदारीची जाणीवही असणे आवश्यक आहे. अशा वेळी सर्व पक्षांनी एकत्र येऊन जनतेमध्ये विश्वास निर्माण करणे अधिक गरजेचे असते. अर्थात, राहुल गांधी ज्या पक्षाचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत, अशा काँग्रेसकडून सामंजस्याची अपेक्षा करणेही चुकीचेच. त्यामुळे नागरिकांनी अफवांमधून अनागोंदी माजवण्याचा कुटील डाव असणाऱ्यांच्या कुभांडाला बळी पडण्याऐवजी वास्तवाचा आधार घेऊन निर्णय घेणे, हेच एक सजग, जबाबदार नागरिक म्हणून शहाणपणाचे ठरेल!

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की,विशेषतः दुर्लक्षित असलेल्या फिलेरियासिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, भारतातून फिलेरियासिस निर्मूलन करण्याच्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय फिलेरियासिस निर्मूलन शक्य नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील या आजाराचा प्रादुर्भाव हा नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत.

सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

# धनगर आरक्षणासाठी संताप; लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन



**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात धनगर समाज आक्रमक झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी बीडच्या लिंबागणेश येथे मोठं रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं आहे.

धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी आंदोलक दिपक बो-हाडे यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू केलं आहे. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने समाजात संताप वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर स्व. रामराव होळकर यांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडल्याने आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. सरकारच्या संवेदनाहीन धोरणावर तीव्र टीका होत आहे.

निषेधार्थ मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अहमदपूरअहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला. आंदोलनाची सुरुवात स्व. रामराव होळकर यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. आंदोलनात स्थानिक नागरिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले, तसेच सरकारने तातडीने धनगर आरक्षणाचा निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी केली गेली.

## धक्कादायक! हॉस्पिटलच्या टीमनेच केला नवजात बाळाचा ३ महिन्यापेक्षा अधिक सांभाळ

**सांगली /प्रतिनिधी :** सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमधील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या हॉस्पिटलमध्ये २६ नोव्हेंबर २०२५ रोजी एका बाळाचा जन्म झाला. बाळाच्या जन्मानंतर दुसऱ्याच दिवशी त्या बाळाची आई बाळाला सोडून पळून गेली. आईचा शोध घेण्यात आला मात्र ती कुठेच सापडली नाही. हे बाळ शारीरिक दृष्ट्या नाजूक असल्यानं त्या बाळाचा सांभाळ तेथील स्टाफनेच करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान बाळाला हर्निया झाल्याचेही समोर आले. त्यावर ऑपरेशन सुद्धा करण्यात आलं.

या आईने एका मुलाला जन्म दिला आणि त्यानंतर ती हॉस्पिटलमधून चक्क पळून गेली त्यानंतर सिव्हिल स्टाफने तब्बल महिन्यापेक्षा अधिक काळ या बाळाचा सांभाळ केला. आज म्हणजेच गुरुवारी (२६ मार्च) हे बाळ पुण्याला पाठवण्याची वेळ आली त्यावेळी सिव्हिलच्या स्टाफने बाळाचे नामकरण केलं आहे.

यावेळी आईविना असलेल्या या बाळाचं नाव वीरप्रताप असं ठेवण्यात आलं आहे. शासनाच्या आदेशाने हा तीन महिन्याचा वीरप्रताप पुण्याकडे रवाना झाला असून वीरप्रतापला निरोप देताना त्याचा सांभाळ करणाऱ्या स्टाफला रडू कोसळले.

हे बाळ सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या विशेष नवजात शिशु दक्षता केंद्रातील स्टाफ सांभाळत होते. तब्बल तीन महिने या बाळाचा सांभाळ केल्यानंतर कोर्टाच्या आदेशाने आज बाळाला पुण्याला पाठवण्यात आलं. याबाबतचे कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून या बाळाला पुण्याला पाठवण्यात आलं आहे.

# रस्ते अपघातग्रस्तांसाठी जीवनदायी असलेली 'पीएम-राहत' योजना प्रभावीपणे राबवा-सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

### अपघातग्रस्तांना तात्काळ दीड (१.५०) लाख रुपयापर्यंत कॅशलेस उपचाराचा दिलासा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीने दीड (१.५०) लाख रुपयापर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क उपलब्ध करून देण्याऱ्या 'पीएम-राहत' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य हमी सोसायटीची भूमिका महत्वाची आहे. रूग्णाला 'गोल्डन अवर'मध्ये तातडीचे उपचार देवून मृत्यूदर कमी करण्यास कटिबद्ध रहावे असे आवाहन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात आयोजित जनआरोग्य योजनेच्या बैठकीत केले.

केंद्र शासनाच्या सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी ''प्रधानमंत्री रस्ता अपघातग्रस्त रुग्णालयीन उपचार आणि हमी उपचार (पीएम राहत) योजना'' आणली आहे. या योजने अंतर्गत ''आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'' व ''महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना'' अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या राज्यातील कोणत्याही रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना तातडीने ७ दिवसांपर्यंत दीड (१.५०) लाख रुपयांपर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क (रोखरहित) देण्यात येणार आहेत. अनेकदा अपघात झाल्यावर आर्थिक अडचणींमुळे उपचारास विलंब होतो. वेळेत उपचार मिळत नाहीत. ''पीएम-राहत'' योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

पीएम -राहत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य सोसायटीच्या प्रशासनाची भुमिका महत्वाची असुन, रूग्णाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी अंगीकृत रुग्णालयात दाखल करणे. पोलिसांकडून अपघाताची खात्री करून उपचारांना मान्यता देणे, - योजनेअंतर्गत उपचारास मंजूरी देणे व मंजूर दावे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करण्याची आरोग्य सोसायटीची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात (पीएम -राहत ) योजना राबवण्यासाठी परिवहन विभागाच्या अखत्यारीतील ''राज्य रस्ते सुरक्षा परिषद'' ही नोडल एजन्सी नियुक्त करण्यात आली असुन, योजनेची अंतिम देयके परिवहन विभागामार्फत दिली जातात.

रस्ते अपघातानंतर २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या सर्व अपघातग्रस्त भारतीय तसेच परदेशी नागरिकांनाही ''पीएम राहत'' योजनेचा लाभ मिळणार आहे. उपचार खर्च अपघाताच्या तारखेपासून कमाल ७ दिवसांपर्यंत समाविष्ट (आवृत) केला जाणार आहे. या योजनेअंतर्गत नियुक्त (निर्दिष्ट) व अनियुक्त (अनिर्दिष्ट) रुग्णालयांमध्येही उपचार करता येणार आहेत.

पीएमजेएवाय, एमजेपीजेएवाय व पीएम राहत योजनेत सामाविष्ट अंगीकृत रुग्णालये ही नियुक्त (निर्दिष्ट) रुग्णालये आहेत. या व्यतिरिक्त सर्व रुग्णालये अनियुक्त



(अनिर्दिष्ट) रुग्णालये आहेत. या सर्व रुग्णालयांत अपघातग्रस्त रुग्णास स्थिरीकरण उपचार देणे अपेक्षित आहे. स्थिरीकरण उपचारानंतर रुग्णास पुढील उपचारांसाठी नियुक्त (निर्दिष्ट) अंगीकृत रुग्णालयात हलविणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी ११२ या आपत्कालीन प्रतिसाद सहाय्य प्रणाली क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच या योजनेची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी केले आहे.

या बैठकीला सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जनआरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, नागरी आरोग्य अभियान आयुक्त सुनील भोकरे, जन आरोग्य योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दयानंद जगताप, आरोग्य विभागाच्या सह संचालिका डॉ. सुनीता गोल्हाईत व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी निवड चाचण्या जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधीः** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत 'मिशन लक्ष्यवेध'अंतर्गत मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडूंची निवड प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश राज्यातील गुणवंत खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी घडवणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत वेटलिफ्टिंग, लॉन टेनिस, शूटिंग व टेबल टेनिस या क्रीडा प्रकारांसाठी विभागीय स्तरावर निवड चाचण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. निवड प्रक्रियेदरम्यान तज्ञ प्रशिक्षकांमार्फत खेळाडूंचे कौशल्य परीक्षण करण्यात येणार असून निवड झालेल्या खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण व करिअर मार्गदर्शन दिले जाणार आहे.

निवड चाचणी तपशील पुढीलप्रमाणे :

१) वेटलिफ्टिंग
ठिकाण : तालुका क्रीडा संकुल, कोपरी, ठाणे
संपर्क प्रमुख : श्रीमती हिमानी परब
मोबाईल : ८३६९७१६०४६
दिनांक : ०६ एप्रिल २०२६ । वेळ : सकाळी ८.०० वा.

२) लॉन टेनिस
ठिकाण : महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन, कुपरेज क्लब, मुंबई
संपर्क प्रमुख : श्रीमती प्रीती टेमघरे
मोबाईल : ९०२९२५०२६८
दिनांक : ०७ एप्रिल २०२६ । वेळ : सकाळी ८.०० वा.

३) शूटिंग
ठिकाण : कामगार कल्याण मंडळ, दादर, मुंबई
संपर्क प्रमुख : श्रीमती नेहा साप्ते
मोबाईल : ९९६९९७२०२२
दिनांक : ०८ एप्रिल २०२६ । वेळ : सकाळी ८.०० वा.

४) टेबल टेनिस
ठिकाण : नवी मुंबई स्पोर्ट्स अँड सामाजिक विकास मंडळ, पनवेल
संपर्क प्रमुख : श्री. नीलकंठ आखाडे
मोबाईल : ९९६७२७७०८२
दिनांक : ०९ एप्रिल २०२६ । वेळ : सकाळी ८.०० वा.

या निवड चाचण्यांसाठी २५ वर्षांखालील खेळाडू पात्र असून, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतलेला अनुभव आवश्यक आहे.

इच्छुक खेळाडूंनी आपला अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करावा.

ई-मेल : missionlakshvedhamumdivgmail.com

अर्ज लिंक : https://forms.gle/2f7ypkikdUBKNf7f-G$

अर्ज करण्याची अंतिम तारीख : ३१ मार्च २०२६

अर्जासोबत जन्मदाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट व पालक संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे. निवड चाचणीच्या दिवशी मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ही माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

# पेट्रोल पंप बंदच्या अफवेने अमरावतीत खळबळ; एसआरपीएफपंपावर नागरिकांची तुफान गर्दी

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधीः** शहरात पेट्रोल पंप बंद राहणार असल्याच्या अफवेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, चांदूर रेल्वे रोडवरील एसआरपीएफ वेलफ ेअर पेट्रोल पंपावर वाहनधारकांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील दोन ते तीन पेट्रोल पंप अचानक बंद पडल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. त्यातच सोशल मीडियावर पेट्रोल पंप बंद राहणार असल्याचे मेसेज व्हायरल झाल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली. या पार्श्वभूमीवर चांदूर रेल्वे रोडवरील एसआरपीएफ पोलीस गट क्रमांक ९ च्या वेलफेअर पेट्रोल पंपावर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. वाहनधारकांनी लांबच लांब रांगा लावत तासन्तास थांबून पेट्रोल भरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दरम्यान, एसआरपीएफ वेलफ ेअर पेट्रोल पंपाचे व्यवस्थापक योगेश जळमकर यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. ''आमच्याकडे पुरेसा पेट्रोल साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

गर्दीत उभ्या असलेल्या काही नागरिकांनीही आपली नाराजी व्यक्त केली. ''इथे खूप मोठी गर्दी झाली आहे, तासन्तास रांगेत उभं राहावं लागतंय,'' अशी प्रतिक्रिया एका ग्राहकाने दिली, तर ''अफवांमुळेच ही परिस्थिती निर्माण झाली,'' असेही काहींनी सांगितले.सोशल मीडियावरील अफवांमुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीत प्रशासनाने नागरिकांना शांत राहण्याचे आणि कोणत्याही अप्रमाणित माहितीस बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

## नीलम गोऱ्हेंचा आदेश रद्द, तुषार दोशींचे निलंबन नाहीच; पोलीस अधीक्षक सातारा कार्यालयात दाखल



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :**पोलीस अधीक्षक तुषार दोशी हे आज त्यांचा पोलीस मुख्यालयात हजर झाले असून दैनंदिन कामकाजाला देखील त्यांनी सुरुवात केल्याचं पहायला मिळालं. विधिमंडळ अधिवेशन कार्यकाळात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशींच्या निलंबनाचे आदेश दिले होते. मात्र, अधिवेशनाच्या शेवटच्यादिवशी सभापती राम शिंदे यांनी उपसभापतींचा आदेश रद्द करत सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे, तुषार दोशी यांचे निलंबन झाले की नाही, हा प्रश्न अनुत्तरीत होता. मात्र, तुषार दोशी आज आपल्या कार्यालयात हजर झाल्याने त्यांचे निलंबन झाले नसल्याचे स्पष्ट झालं आहे.

जिल्हा परिषद निवडणूक अध्यक्षपदाच्या निवडीवेळी राष्ट्रवादीच्या दोन सदस्यांना जिल्हा परिषद सभागृहात घेऊन जाताना मंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांना पोलिसांकडून धक्काबुक्की झाली होती. या दरम्यान झालेल्या गोंधळानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानपरिषदेत सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी आणि त्यांच्या काही अधिकाऱ्यांना निलंबित करावे अशी मागणी केली होती. या मागणीनंतर सभागृहात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशी यांना निलंबित करण्याचे निर्देशही दिले होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकाराची चौकशी केली जाईल असे सांगितले. तसेच, सभापती, उपसभापती आणि तालिका अध्यक्षांच्या अधिकारासंदर्भातही त्यांनी कायदेशीर बाजू तपासण्याची गरज असल्याचे म्हटले होते. त्यातच, अधिवेशनाच्या शेवटच्यादिवशी सभापती राम शिंदे यांनी नीलम गोऱ्हेंनी दिलेले आदेश रद्द केले. या घटनाक्रमानंतर पोलिस अधीक्षक दोशी हे आज दोन दिवसांनंतर पोलिस मुख्यालयात हजर झाले आहेत. त्यामुळे, त्यांच्यावरील निलंबनाची कारवाई मागे घेण्यात आली किंवा त्यांचे निलंबन झालेच नाही, हे स्प्ट झालं आहे.

सभापती राम शिंदे यांनी दिलेल्या आदेशानंतर साताऱ्याचे एसपी तुषार दोशींचे निलंबन झाले की नाही? असा सवाल मंत्री शंभुराजे देसाईनी सभागृहात केला होता.तसेच, निलंबन केलं की नाही ते सांगावे नाहीतर आम्ही कोर्टात जाऊ, असे शशिकांत शिंदेंनी म्हटले.

# संगीत आणि तंत्रज्ञानाचा संगम घडवणारा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम मंत्री अ‍ॅड्. आशिष शेलार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधीः** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विरासत आणि विकास' या संकल्पनेनुसार राज्य शासन काम करत आहे. महाराष्ट्राची समृद्ध परंपरा, कला, साहित्य, लोकसंगीत आणि संस्कृती आधुनिक पद्धतीने जगासमोर मांडण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि राष्ट्राभिमान यांचे भव्य व नेत्रदीपक दर्शन घडविणारा अभूतपूर्व ड्रोन शो मुंबई येथे आयोजित करण्यात आला, त्या कार्यक्रमाच्या उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव डॉ.किरण कुलकणी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे तसेच या ड्रोन शोचा आनंद घेण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तृत्वातून प्रेरणा घेऊन सांस्कृतिक वारसा जपला जात असल्याचे मंत्री अ‍ॅड शेलार यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील संस्कृती ही ''सॉफ्ट पॉवर'' म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आल्याची माहिती देताना मंत्री शेलार म्हणाले की, पूर्वी दरवर्षी ३००-३५० कार्यक्रम होत असताना आता १२०० हून अधिक कार्यक्रम राज्यभर आयोजित केले जात आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह इतर सहकाऱ्यांच्या मदतीने हा विस्तार साध्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

यावर्षी गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आल्याचे जाहीर करत त्यांनी सांगितले की, देश-विदेशात, विशेषतः मॉरिशस येथेही सार्वजनिक गणेशोत्सवाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच गणेशोत्सवाला युनेस्को च्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

या कार्यक्रमात प्रथमच ड्रोन शोच्या माध्यमातून महाराष्ट्राचा नकाशा, छत्रपती शिवाजी महाराज यांचे दर्शन तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त विशेष सादरीकरण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. हा उपक्रम प्रख्यात संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांच्या संकल्पनेतून साकारला असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिवचरित्राची गाथा आकाशात उजळणार सचिव डॉ.किरण कुलकर्णी

रामनवमीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेला आजचा कार्यक्रम भव्य, दिव्य आणि ऐतिहासिक असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले. महाराष्ट्राच्या परंपरेचे वैभव आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा नव्या माध्यमातून उलगडण्याचा हा अनोखा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करत छत्रपती शिवाजी महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या पराक्रम आणि कर्तृत्वाचे वर्णन करताना शब्द अपुरे पडतात, असे सांगत त्यांनी या महान व्यक्तिमत्त्वांविषयी असलेल्या आदरभावाला उजाळा दिला.

''छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याबद्दल किती लिहावे आणि किती बोलावे, असा प्रश्न पडतो. त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करताना कागद कमी पडतो, शब्द थिटे पडतात,'' असे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने आधुनिक माध्यमांचा वापर करत आकाशाच्या विशाल पटावर शिवचरित्र उलगडण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले. या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन नागरिकांना अनुभवता येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रामनवमी निमित्त आयोजित या कार्यक्रमात आकाशात चमचमणाऱ्या दिव्यांच्या माध्यमातून शिवकालीन पराक्रमाचे दृश्य साकारले जाणार असून, नागरिकांनी या अनोख्या अनुभवाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.


## शब्दकोडे क्र. 92

आडवे शब्द

१. धंद्यातील दोन अपरिहार्य गोष्टी ५. हिंमत ७. श्रम ८. घराबरोबर फिरणारे ९. सहाय्यक ११. फुरसत १३. वस्त्र विणण्याचे साधन १४. डोंगराचा कोसळणारा भाग १५. साटेलोटे १७. अकबराच्या दरबारातील संगीतसम्राट १८. सकस २०. काळ विचारणारा प्रश्न २१. बयाणा २२. मुदतीचा शब्द २४. पाठिंबा २६. वर्तमानपत्रातील कप्पा २८. मनाला आलेला थकवा ३०. अंगरखा ३२. चांदी ३४. मुस्लिमांचा उपवासाचा महिना ३६. अभिप्राय ३७. शेळी ३९. विलंब (हिंदी) ४०. कठोर, नरमच्या विरुद्ध ४२. हे दान आता मिळाले तरी सांभाळणे अवघड! ४३. पालक पित्यावरून श्रीकृष्णाचे पडलेले एक नाव ४४. सीताहरण करणारा ४५. फलक, टोपली ४६. उलटी, ओकारी ४७. कौशल्य ४९. दरमहा ५१. आश्चर्याची गोष्ट ५२. लहान मूल ५३. डोक्यात मारलेली थापटी ५५. तडफड, घालमेल ५७. जैन साधू ६०. उष्ण ६२. रंग बदलणारा प्राणी ६३. चाकरमानी ६५. सेवक ६६. सुरस गोष्टी ६८. घरोघरी ७०. उन्हाची तलखी, तीव्रता ७१. नांगर धरणारा, बलरामाचे एक नाव ७२. संपूर्ण ७३. छिद्र

उभे शब्द

१. अभिनव २. एक शिकारी जमात ३. सा. न. वि. वि. मधील पहिले तीन शब्द ४. पोट ५. स्वामी ६. चामखीळ ७. वालाचा एक प्रकार ९. कामदेव १०. तात्काळ ११. पावसाची धार १२. मोठा जमीनदार १३. ही कधी वैरिणी होऊ शकत नाही १५. उद्याच्या नंतरचा दिवस १६. लाडीक १९. मंत्रीमंडळ २०. शिखराचे टोक २३. संगीतातील एक राग २४. प्राचीन, जुने २५. मातीचा कण २७. पंजाबपर्यंत पोचलेले मराठी संत २९. पक्ष्यांचा राजा ३१. धमकी ३३. जोडीतील चर्मवाद्य ३५. नाशाचे मंत्रतंत्र ३८. चिवचिवाट ४०. बडबड, बडबडीचा त्रास ४१. नशीब, दैव, कार्य ४२. श्रीकृष्णाचे एक नाव ४४. मळी, उसाच्या रसाचा रांधा ४८. सखी ५०. मत देणारा ५१. गाव, शहर ५२. भिंतीचा निघालेला पापुद्रा ५४. वामकुक्षी ५६. सुसर ५७. नाश पावणारे ५८. दया ५९. मेहरबानी ६१. मनाची शक्ती ६२. टोळीचा प्रमुख ६२अ. चित्रपटाचा गोषवारा ६४. पोते शिवण्याची सुई ६६. यमनगरी ६७. उद्दिष्ट ६९. हनुमानाचे राममंदिरातील रूप



### शब्दकोडे क्र. 91 चे उत्तर

आडवे उत्तर

१.मानवता ४.संगमरवर ८.एडका १०.सारखा १२.वाफ १५.कारखानदार १८.हारजीत १९.धबधबा २०.सनद २१.पार २३.मर २४.लाजरा २६.होकायंत्र २७.नकारघंटा ३०.रवाळ ३१.वसंत ३२.कसदार ३४.निळवा ३६.मगर ३८.धड ३९.मास्तर ४०.देखावा ४१.चणे ४२.शरमिंदा ४३.उदक ४४.कैवार ४५.तक्र ४६.सैनिक ४७.नाक ४८.सकल ४९.तप ५०.अन्य ५१.तास ५३.गदा ५४.यजमान ५५.भरभराट ५७.सांज ५९.नवार ६२.गवत ६३.खोगीरभरती ६५.मजा ६७.पार्वती ६८.कालपरवा ६९.कसाबसा ७१.घोळ ७२.रीत

उभे उत्तर

१.माया २.वसा ३.तारकाबारका ५.गजानन ६.रकार ७.रत्नहार ८.एकजीव होणे ९.कावा ११.खार १३.फट १४.अंबर १६.खस १७.दादला १९.धमकावणी २१.परावार २२.सायंकाळ २५.जरदाळू २७.नतमस्तक २८.रफार २९.टाकणखार ३३.माड ३४.निवारक ३५.वायदा ३७.गर ३८.धणे ३९.मादक ४०.देवालय ४१.चक्र ४२.शनि ४३.उनाड ४४.कैक ४५.तपन ४६.सैन्यभरती ४८.सदा ४९.तमासगीर ५१.तारा ५२.सटवी ५३.गजगती ५६.भरमसाट ५८.भूतकाळ ५९.नभ ६०.वारकरी ६१.सपाता ६३.खोपट ६४.रवाना ६६.जाब ७०.साय

# जनगणना २०२७ साठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिरास उत्साहात सुरुवात

## अचूक आणि पारदर्शक माहिती संकलनावर भर द्या – जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखण्याचा मूलभूत पाया आहे. त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने नियमावलीचे काटेकोर पालन करत अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर, जनगणना संचालनालय व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, सहायक संचालक अजय ठाकूर, सांख्यिकी अन्वेषण विशाल दिवेकर आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी नमूद केले की, जनगणना प्रक्रियेत वेळेचे आणि अचूकतेचे विशेष महत्त्व आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी इन्स्ट्रक्शन मॅन्युअलचा सखोल अभ्यास करावा आणि आपल्या शंकांचे वेळीच निरसन करून घ्यावे. हे प्रशिक्षण टॉप-टू-बॉटम सर्व घटकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, यामुळे सक्षम आणि जबाबदार मनुष्यबळ तयार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या या विशेष प्रशिक्षण शिबिराला आजपासून उत्साहात सुरुवात झाली आहे.प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे. या शिबिरातून सक्षम, सजग आणि जबाबदार मनुष्यबळ तयार होऊन आगामी जनगणना अधिक प्रभावीपणे राबविता येईल.

प्रशिक्षणादरम्यान जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगण्यात आली. डिजिटल साधनांचा वापर, मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलन, डेटा एंट्रीतील अचूकता आणि माहितीची गोपनीयता राखण्याचे नियम यावर विशेष भर देण्यात आला. तसेच प्रत्यक्ष क्षेत्रात येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षण अधिक प्रभावी केले. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष सरावाची संधी देण्यात आली. विविध परिस्थितींमध्ये कसे कार्य करावे, याचे मार्गदर्शन करण्यात आले. सहभागींच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

## वृत्तविशेष...

### पोस्ट ऑफिसला बॉम्बने उडवण्याची धमकी; BDDS पथकाकडून कसून तपासणी



दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** शहरातील मुख्य पोस्ट ऑफिसला बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा निनावी ई-मेल आल्याने गुरुवारी एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे पोस्ट विभागात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाणा येथील मुख्य पोस्ट ऑफिस उडवून देण्याची धमकी मेलद्वारे देण्यात आली. याची माहिती मिळताच पोस्ट कार्यालयातील कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली. तत्काळ पोलिस प्रशासनाला कळविण्यात आले. घटनेची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी डॉग स्कॉड व बॉम्ब शोधक व नाशक पथक (इऊऊड) घटनास्थळी दाखल केले. पथकाने पोस्ट ऑफिसमधील सर्व पार्सल तसेच संपूर्ण परिसराची कसून तपासणी केली. तपासणीनंतर कोणताही संशयास्पद साहित्य किंवा धोका आढळून आला नसल्याचे स्पष्ट झाले. यामुळे पोस्ट ऑफिसमधील कर्मचारी आणि नागरिकांनी सुटकेचा श्र्वास सोडला. दरम्यान, या घटनेमुळे काही काळ कामकाजावर परिणाम झाला असला तरी सध्या पोस्ट ऑफिसचे नियमित कामकाज सुरळीत सुरू असल्याची माहिती पोस्टमास्टर आशिष इंगळे यांनी दिली. दरम्यान, धमकीचा मेल कोणी पाठवला याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

### मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलन येत्या रविवारी पळसप येथे होणार

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** स्वर्गीय अजितदादा पवार साहित्य नगरी पळसप तालुका धाराशिव येथे शिक्षणमहर्षी वसंतराव काळे प्रतिष्ठान, किसान वाचनालय पळसप, महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतीने २९ मार्च रोजी ११ वे मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलन होणार आहे. या संमेलनात ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन, चित्रप्रदर्शन, परिसंवाद, कविसंमेलन आदी कार्यक्रमांसह स्त्रीरोग निदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष, शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली.

शिक्षक आमदार वसंतराव काळे यांनी मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या स्मृतीला उजाळा देता यावा, यासाठी त्यांच्या २० व्या पुण्यस्मरणदिनानिमित्त हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. सुरेश सावंत (नांदेड) हे संमेलनाध्यक्ष आहेत. २९ मार्चला सकाळी आठ वाजता ग्रंथदिंडीचे उदघाटन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे कोषाध्यक्ष जयकुमार शितोळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजता ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन मराठी साहित्य मंडळाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. घ. ना. पांचाळ (मुंबई) यांच्या हस्ते तर सव्वा दहा वाजता सुप्रसिद्ध चित्रकार शिवाजी हांडे यांच्या चित्रप्रदर्शनाचे उदघाटन सुप्रसिद्ध साहित्यिक राजेंद्र अत्रे (धाराशिव) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

सकाळी साडेदहा वाजता संमेलनाचे उदघाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सुरेश सावंत अध्यक्षस्थानी असतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री संजय बनसोडे, मराठवाडा साहित्य परिषदेचे संमेलनाध्यक्ष प्रा. फ. म. शहाजिंदे हे उपस्थित राहणार आहेत. दुपारी दीड वाजता बदलते ग्रामीण जीवन या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. गंगाधरराव हिंगोले अध्यक्षस्थानी असतील. सुप्रसिद्ध वक्ते प्राचार्य राजकुमार मस्के (उदगीर), प्रा. डॉ. कैलास इंगळे (छत्रपती संभाजीनगर) यांचा सहभाग असेल. दुपारी तीन वाजता कथाकथन होईल. सत्यशिला तौर (जालना) अध्यक्षस्थानी असतील. प्रा. सुरेश पाटील (अंबाजोगाई), स्वाती कान्हेगावकर (नांदेड) यांचा सहभाग असेल. दुपारी साडेचार वाजता कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. प्रा. जिजा शिंदे (छत्रपती संभाजीनगर) अध्यक्षस्थानी असतील.

संमेलनाचा समारोप सायंकाळी सहा वाजता होणार आहे. डॉ. सुरेश सावंत अध्यक्षस्थानी असती. यावेळी छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण, उमरगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रविण स्वामी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी (मुंबई), मराठवाडा साहित्य परिषदेचे सदस्य विलास सिंदगीकर (छत्रपती संभाजीनगर) यांचा सत्कार करण्यात येणार आहे. रात्री आठ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या संमेलनाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य मधुकरराव गायकवाड, प्राचार्य अनिल वसंतराव काळे, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा. अंकुश नाडे, बालाजी तांबे यांनी केले आहे.

दरम्यान, २८ मार्चला सकाळी दहा वाजता स्त्रीरोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रात्री आठ वाजता ह. भ. प. कु. ईश्वरी दिदी महाराज यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

# पेट्रोलसाठी जिल्ह्यात हाहाकार! २ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा...

## 'अफवांवर विश्वास ठेऊ नका' प्रशासनाचे आवाहन




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात पेट्रोल व डिझेल उपलब्धतेवरून तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली असून अनेक पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र समोर आले आहे. काही ठिकाणी इंधनाचा साठा कमी झाल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

जिल्ह्यात एकूण १६६ पेट्रोल पंप असून, त्यापैकी काही पंपांवर इंधन उपलब्ध नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. ज्या ठिकाणी इंधन उपलब्ध आहे, त्या ठिकाणी वाहनांच्या लांबलचक रांगा लागलेल्या दिसत आहेत. अनेक ठिकाणी या रांगा २ किलोमीटरपर्यंत पोहोचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दुचाकी व चारचाकी वाहनचालक सकाळपासूनच रांगेत उभे राहत असल्याने वाहतूक व्यवस्थेवरही मोठा ताण पडत आहे.

शहरासह ग्रामीण भागातही याचे परिणाम जाणवत आहेत. दरम्यान, इंधन तुटवड्याबाबत विविध अफवा पसरत असल्याने नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. याबाबत प्रशासनाने स्पष्ट केले असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे केली बोमन इराणी यांनी मागणी, मजेदार व्हिडिओ व्हायरल

**मुंबई/प्रतिनिधी** इराण-इस्रायल युद्धाचा परिणाम हा जगावर पडत आहे. सध्या सिलेंडर आणि पेट्रोलसाठी खूप संघर्ष लोकांना करावा लागत आहे. दरम्यान अलीकडेच अभिनेता बोमन इराणी यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड वेगानं व्हायरल झाला आहे. यामध्ये ते मजेशीर पद्धतीनं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना एक संदेश देत आहे. ट्रम्पनं यापूर्वी म्हटलं होतं की, ते इराणी लोकांशी चर्चा करत आहेत. यावर आता अभिनेत्यानं गंमतीनं म्हटलं की, ते शांततेसाठी काहीही करतील. ते ट्रम्प यांना आमंत्रित करतील, पण त्यांना सिलेंडर आणावा लागेल. बोमन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना दिला संदेश : 'इराणी लोक डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी शांतता चर्चेसाठी तयार आहेत' या कॅप्शनसह अभिनेत्यानं इन्स्टाग्रामवर एक मजेशीर व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओत त्यांनी म्हटलं, ''तुम्हाला माहीत असेलच की, डोनाल्ड ट्रम्प यांना इराणी लोकांशी बोलायचे आहे, ही बातमी व्हायरल होत आहे. तीन जणांना गुपचूप आमंत्रित करण्यात आलं आहे आणि चर्चा सुरू आहे, एक स्मृती इराणींसोबत, अरुणा इराणींसोबत आणि एक बोमन इराणींसोबत. मी तयार आहे. आम्ही शांततेसाठी काहीही करू शकतो. माझी एकच अडचण आहे, मला वॉशिंग्टनला जायचे नाही.'' अभिनेत्यानं पुढं म्हटलं, ''ट्रम्प मुंबईत, विशेषत: दादरमधील पारशी वस्तीत आले तर उत्तम होईल. त्यांचं आम्ही स्वागत करू, त्यांना आम्ही खाऊ घालू.'' मात्र जर ते गॅस सिलेंडर घेऊन आले, तर सर्व काही सोपे होईल.''

आता बोमन इराणी यांच्या विधानावर अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. या पोस्टवर जावेद जाफरी फरहान अख्तर, सोनिया राझदान आणि समीरा रेड्डी यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. दरम्यान बोमन हे मुंबईमधील असून ते इराणी वंशाचे पारशी आहे. तसेच अमेरिका इराणच्या काही लोकांशी संवाद साधत असल्याचे ट्रम्प यांनी म्हटलं आहे. मात्र इराण या बातम्या खोट्या असल्याचं म्हणत आहेत.

# शिर्डीत श्रीरामनवमी उत्सवाचा भक्तीमय जल्लोष, साईबाबा मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** श्रीराम नवमी उत्सवाची शिर्डीत भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली. आज उत्सवाचा मुख्य दिवस असल्यानं साई दर्शनासाठी लाखो भाविकांची मांदियाळी शिर्डीत दिसून येत आहे. साईनामाचा जयघोष करत शेकडो पायी पालख्या शिर्डीत दाखल झाल्या आहेत. उत्सवासाठी साईबाबा मंदिरावर विद्युत रोषणाई तसंच साई मंदिरात आकर्षक फ लांची सजावट करण्यात आलीय.

शिर्डीत रामनवमीचा उत्साह – शिर्डी साईबाबा संस्थानच्या वतीनं यंदा ११५ वा श्रीरामनवमी उत्सव साजरा केला जात आहे. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे काल पहाटेपासून द्वारकामाई येथे सुरू असलेल्या साईसच्चरित्र पारायणाची आज उत्सवाच्या मुख्य दिवशी पहाटे सांगता झाली. त्यानंतर साईसच्चरित्र ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली. ग्रामस्थ आणि भाविकांनी कावडीतून आणलेल्या गोदावरीच्या पाण्याची विधीवत पूजा साई संस्थानचे अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आली. यानंतर साईबाबा मूर्ती आणि साई समाधीला जलाभिषेक करण्यात आला.

साईबाबांना मंगलस्नानही कावडीतून आणलेल्या जलानं करण्यात आलं.आज मध्यान्ह आरती अगोदर साई मंदिरासमोर श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात येणार असून, हजारो भाविक राम जन्माचं मोठ्या भक्तीभावानं स्वागत करतात. शिर्डीतील श्रीरामनवमी उत्सवाचे यंदाचे हे ११५ वे वर्ष आहे. भाविकांमध्ये साईभेटीचा आनंद ओसंडून वाहत आहे. श्रीराम नवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर साई मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई तसेच फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

श्रीरामनवमी उत्सवात सहभागी होण्यासाठी देशभरातून भाविक येथे येत असतात. शिर्डीचा उत्सव हा भाविकांसाठी आनंद सोहळा असतो. साईबाबांच्या भेटीसाठी आतूर झालेला भक्तगण साई मूर्तीची केवळ एक झलक पाहण्यासाठी उत्सुक असतो.

मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले – तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवातील ऊर्जा भाविकांना वर्षभर पुरणारी असते. त्यामुळेच हा उत्सव 'याची देही याची डोळा' अनुभवण्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक साई दरबारी दाखल झाले आहेत. जास्तीत जास्त भाविकांना साईदर्शनाचा लाभ मिळावा याकरिता साईबाबा मंदिर आज दर्शनासाठी रात्रभर खुलं ठेवण्यात येणार आहे.

## टीईटी उत्तीर्ण शिक्षकांची तात्पुरती ज्येष्ठता यादी प्रसिद्ध; २७ मार्च रोजी विशेष कार्यशाळेचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार, बुलढाणा जिल्ह्यातील टी.ई.टी. (TET) किंवा सी.टी. ई.टी. (CTET) उत्तीर्ण शिक्षकांची पदोन्नतीसाठीची अंतरिम ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील त्रुटी, दुरुस्त्या आणि आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी २७ मार्च २०२६ रोजी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या २४ मार्च २०२६ च्या पत्रानुसार ही तात्पुरती ज्येष्ठता यादी अंतरिम स्वरूपात प्रसिद्ध करण्यात आली आहे. २५ मार्च रोजी ही यादी सर्व पंचायत समिती आणि गटसाधन केंद्रांच्या नोटीस बोर्डावर तसेच शिक्षकांच्या व्हॉट्सप ग्रुपवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ज्येष्ठता यादीवर ज्या शिक्षकांचे आक्षेप असतील, ज्यांना माहितीमध्ये दुरुस्ती करायची असेल किंवा ज्यांचे नाव यादीत समाविष्ट करायचे असेल, अशा सर्व शिक्षकांसाठी २७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता 'श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद बुलढाणा' येथे कार्यशाळा आयोजित केली आहे.

ज्यांनी अद्याप आपले अर्ज गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर केलेले नाहीत, त्यांनी आवश्यक पुराव्यांसह आणि लेखी अर्जासह या कार्यशाळेला स्वतः उपस्थित राहावे. तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी किंवा त्यांच्या जबाबदार प्रतिनिधींना या कार्यशाळेत उपस्थित राहून दुरुस्त्यांचे कामकाज पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कार्यशाळेतील कामकाजानंतर शिक्षकांची 'अंतिम ज्येष्ठता यादी' प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर कोणत्याही प्रकारचे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तरी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पात्र शिक्षकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या माहितीची खातरजमा करून घ्यावी, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी केले आहे.

# सुटाळा बुद्रुक येथे शिवपार्वती विवाह सोहळा मोठ्या थाटात; भाविकांची मांदियाळी

दैनिक आपला विदर्भ



**खामगाव/प्रतिनिधी:** तालुक्यातील सुटाळा बुद्रुक येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही भगवान शिव व माता पार्वती यांचा विवाह सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या मंगल सोहळ्यासाठी गावासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

उत्सवाच्या निमित्ताने स्थानिक शिव मंदिर आकर्षक विद्युत रोषणाईने सजविण्यात आले होते. रंगीबेरंगी दिव्यांच्या प्रकाशात न्हालेल्या मंदिराने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विवाहाच्या पूर्वसंध्येपासूनच मंदिर परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. मुख्य विवाह सोहळा शास्त्रोक्त पद्धतीने पार पडला. पुरोहितांच्या मंत्रोच्चारात आणि मंगलाष्टकांच्या गजरात भगवान शिव आणि माता पार्वती यांचा विवाह विधी संपन्न झाला. या वेळी 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. उपस्थित भाविकांना जणू कैलासावरील दैवी सोहळ्याचा अनुभव आल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

या सोहळ्यासाठी सुटाळा बुद्रुक तसेच परिसरातील गावांमधून महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता. विवाहानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सुटाळा बुद्रुक येथील हा पारंपरिक विवाह सोहळा श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक मानला जात असून, यामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.